**राज्य शासनाकडील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केल्यानंतर कार्यक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १०००/ प्र.क्र. १०७ (५)/ पापु. ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १४ नोव्हेंबर, २०००**

**वाचा:-** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक भूजल १०९८ / प्र.क्र.५११/ पापु-१५, दिनांक १६.१२.९८

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/ पापु-०७, दिनांक २७.७.२०००

३) शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पंराज.१०००/प्र.क्र. २५३/ ०६, दिनांक २४.१०.२०००

४) शासन अधिसूचना , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु १०००/प्र.क्र.१०७ (१) / पापु- ०७, दिनांक १४.११.२०००

**शासन निर्णय :**

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार घटनेच्या अनुच्छेद २४३ (जी), च्या अनुसूची ११ मधील अनुक्रमांक ११ नुसार **"पाणी पुरवठा"** हा विषय स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमातील तरतूदीनुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्यावर प्रशासकीय व विकास विषयक कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम , १९६१ च्या पहिल्या अनुसूचीतील **" सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी "** शिर्षका खालील अनुक्रमांक ५८ ते ६१ समोरील नोंदीनुसार "रु. १५ लक्ष पर्यंतच्या" ग्रामीण पाणी पुरवठयाच्या योजनांच्या बांधकामाची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आली होती. प्रस्तावनेत नमूद केलेल्या क्र. ३ येथील अधिसूचनेन्वये **"स्वतंत्र गावच्या रु ७५ लाख पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आले आहे. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सर्व पाणी पुरवठा योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन जिल्हा परिषदांनी / ग्राम पंचायतींनी करावयाची आहे.



३०५

3. प्रस्तावनेत नमूद क्रं. ३ येथील अधिसूचनेनुसार " स्वतंत्र गावाच्या रु ७५ लाख पर्यंतच्या " ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आले असल्याने रुपये १५ लाखापासून ते रु. ७५ लाखापर्यंतच्या ज्या स्वतंत्र गावच्या योजनांचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सध्या सुरु आहे अशा सर्व योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फतच पूर्ण करण्यात याव्यात. या योजना पूर्ण झाल्यानंतर त्या तात्काळ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत करण्यात याव्यात.

4. जिल्हा परिषदांमार्फत स्वतंत्र गावच्या रु.७५ लाखापर्यंतच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कामांचे कार्यान्वयन करताना प्रस्तावनेत नमूद क्र.२ येथील दिनांक २७.७.२००० च्या शासन निर्णयान्वये घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

5. वायूसंपिडक व सुरुंग योजना ही आतापर्यंत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ नुसार जिल्हा परिषदेमार्फत अभिकरण तत्त्वावर राबविण्यात येत होती. सदर योजना प्रस्तावनेतील क्र.४ येथील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० नुसार जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आली असल्याने हा कार्यक्रम राबविण्यासाठी असलेला कर्मचारीवृंदही जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

6. वायू संपिडक सुरुंग योजने सोबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडील उप अभियंता (यांत्रिकी) यांचे कार्यालय जिल्हा परिषदेकडे वर्ग होईल. (सध्या हे कार्यालय जिल्हा परिषदेअंतर्गत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ नुसार अभिकरण तत्वावर कार्यरत आहे.) त्यामुळे आता उप अभियंता (यांत्रिकी) यांचा एक यांत्रिकी उप विभाग जिल्हा परिषदेत कार्यान्वित होईल. या यांत्रिकी उप विभागावर उप अभियंता (यांत्रिकी) यांचे तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण राहील तर पर्यवेक्षीय नियंत्रण हे जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे राहील. **या यांत्रिकी उप विभागामार्फत वायूसंपिंडक सुरुंग योजना, विंधण विहीर कार्यक्रम व विंधण विहिर देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम राबविले जातील.**

7. विंधण विहिर कार्यक्रम राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदांस प्रत्येकी एक डी. टी. एच व नंदूरबार, हिंगोली, वाशिम व गोंदिया जिल्हा परिषदा वगळून इतर सर्व जिल्हा परिषदांना प्रत्येकी एक इनवेल विंधण यंत्र संबंधित कर्मचारीवृंदासह भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून हस्तांतरीत करण्यात येत आहे. जिल्हा परिषदांतर्गत कार्यान्वित होणारा विंधण विहिरींचा कार्यक्रम राबविण्यासाठी यापेक्षा अधिक विंधण यंत्रांची आवश्यकता असल्यास, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सध्या ज्याप्रमाणे खाजगी विंधण यंत्रे भाडयाने लावते त्याचप्रमाणे खाजगी विंधण, यंत्रे भाडयाने लावण्यास जिल्हा परिषदांना मुभा राहील. परंतु असे करतांना आवश्यकतेपेक्षा अधिक विंधण यंत्रे भाडयाने लावली जाणार नाही



३५६

आणि शासनाने व संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी याबाबत वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० नुसार जिल्हा विंधण विहिर कार्यक्रम प्रस्तावनेतील क्र. ४ येथील अधिसूचने अन्वये जिल्हा परिषदांकडे राबविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आला आहे. हा कार्यक्रम जिल्हा परिषदांतर्गत कार्यान्वित करण्यात आलेल्या यांत्रिकी उप विभागामार्फत राबविण्यात यावा. जिल्हयातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत "नळ योजनेसाठी" उद्भवांचे सर्वेक्षण व कूपनलिका आणि विंधण विहिरींसाठी उद्भवाचे सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेस १ सहाय्यक भूवैज्ञानिक व २ कनिष्ठ भूवैज्ञानिकांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या भूवैज्ञानिकांनी पिण्याच्या पाण्याच्या उद्भवांचे सर्वेक्षण करताना यासंदर्भात शासनाच्या स्थायी आदेशांचे, भूजल अधिनियमाचे व संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे व त्यानुसारच सर्वेक्षण करुन पिण्याच्या पाण्यासाठी उद्भव सूचवावेत. या संदर्भात या भूवैज्ञानिकांना काही तांत्रिक बाबी संदर्भात सल्ला आवश्यक वाटल्यास तो संबंधित जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा/ उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडून घ्यावा. सहायक भूवैज्ञानिक व कनिष्ठ भूवैज्ञानिक हे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहतील तर तांत्रिक नियंत्रण संबंधित जिल्हयाच्या वरिष्ठ भूवैज्ञानिकांचे राहील. या सहायक भूवैज्ञानिक व कनिष्ठ भूवैज्ञानिक यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात बसण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच त्यांच्या क्षेत्रिय कामांचा विचार करुन व वाहन व्यवस्था भूवैज्ञानिकांना आवश्यक असलेले मनुष्यबळ मुख्य कार्यकरी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी उपलब्ध करुन

९. विंधण विहिरींचा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्तावनेतील क्र.१ येथील दिनांक १६.१२.९८ च्या आदेशान्वये दिलेले आदेश अधिक्रमित करुन, विंधण विहिरींचा कार्यक्रम पुढील मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात यावा असे आदेश शासन देत आहे.

१) गावठाणात २०० लोकवस्तीमागे एक याप्रमाणात विंधण विहिरी घेण्यात याव्यात, एखाद्या गावठाणात विंधण विहिरी घेणे तांत्रिकदृष्टया शक्य नसल्यास गावठाणापासून१.६ किलोमीटरच्या परिसरात विंधण विहिर घेणे तांत्रिकदृष्टया शक्य आहे किंवा नाही याची तपासणी करावी. तांत्रिकदृष्टया गावठाणाच्या १.६ किलोमीटरच्या परिसरात विंधण विहिर घेणे शक्य असल्यास,



३७७

विंधण विहिर घेण्यात यावी. सदर विंधण विहिर उच्च क्षमतेची असल्यास, त्यावर विद्युतपंप बसवून, पाईपलाईनव्दारे गावात पाणी आणून नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा.

2) गावठाणातील वाडया/वस्त्या/पाडे/तांडे/टोल्यावर खाली निर्देशिलेल्या अटींची पूर्तता होत असल्यास विंधण विहिरी घेण्यात याव्यात.

अ) संबंधित वाडी/वस्ती/पाडा/तांडा टोल्याची लोकसंख्या किमान ५० असली पाहिजे.

आ) संबंधित वाडी/ वस्ती/ पाडा/तांडा/टोल्यापासून १.६ कि.मी. परिसरात पिण्याच्या पाण्याचा उद्‌भव अस्तित्वात असता कामा नये.

इ) संबंधित वाडी/वस्ती/पाडा/तांडा/टोला कायमस्वरुपी असावा व त्याचा निर्देश १९९१ च्या जनगणनेत केलेला असावा जनगणना पुस्तिकेत तसा उल्लेख नसल्यास, सदर वाडी/वस्ती/पांडा/तांडा/टोला कायमस्वरुपी आहे अथवा तो जनगणनेनंतर कायमस्वरुपी म्हणून अस्तित्वात आला आहे असे प्रमाणपत्र जिल्हाधिका-यांनी देणे आवश्यक आहे.

ई) मोठया खातेदारांच्या खाजगी वस्त्यांसाठी विंधण विहिर घेण्यात येऊ नये.

३) सर्वसाधारणपणे पिण्याच्या पाण्याकरिता विंधण विहिरी या ६० मिटर पर्यंत खोल असाव्यात. ६० मिटरपेक्षा जास्त खोलीची विंधण विहिर घ्यावयाची झाल्यास याबाबत सहायक भूवैज्ञानिक यांनी स्वतः तांत्रिक निकष तपासून व प्रत्यक्ष क्षेत्रिय अभ्यासावरुन निश्चित करुन अधिक खोलीची विंधण विहिर आवश्यक असल्याचे सुचवून तसा अहवाल संबंधित जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांमार्फत उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे पाठवावा व उपसंचालकांची मान्यता घेऊन अशा विंधण विहिरी घेण्यात याव्यात. तसेच ६० मिटरपेक्षा जादा खोलीची विंधण विहिर घेण्यास संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेची मंजूरी घ्यावी.

४) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाणी पुरवण्यासाठी घेण्यात आलेल्या विंधण विहिरींपैकी ज्या विंधण विहिरी दगडमाती ढासळून, झाडांची मुळे अथवा पाने कुजून, पाईपलाईन पडल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांमुळे नादुरुस्त होतील व परिणामी त्यांचे पाणी पिण्यासाठी वापरण्यास उपलब्ध होणार नाही. अशा विंधण विहिरीचे पुनरुज्जीवन करण्यात यावे. मात्र असे पुनरुज्जीवन करण्यापूर्वी विहिरींची नासधुस अथवा नादुरुस्ती जाणून बुजून करण्यात आली नाही व ती तशी करण्यात आली असेल तर संबंधित व्यक्ति विरुध्द भूजल कायद्याच्या



३७८

कलम १६ अन्वये सार्वजनिक पाण्याचे स्त्रोताला बाधा पोहोचविण्याचे कारणासाठी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. असे ग्रामपंचायतींकडून अथवा ग्राम पाणी पुरवठा समितीचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. अशा पुनरुज्जीवन कार्यक्रमामुळे विंधण विहिरीच्या पाण्यामध्ये वाढ होणार नसल्याचे संबंधित सहाय्यक भूवैज्ञानिकांचे मत झाल्यास बदली नवीन विंधण विहिर घेण्यास शासनाची हरकत नाही. मात्र, उक्त कारणांमुळे बंद झालेल्या विंधण विहिरींची जिल्हा वरिष्ठ भवैज्ञानिकांकडून तपासणी करुन घ्यावी व सदर विंधण विहिरींचे पुनरुज्जीवन करणे शक्य नाही असे त्यांनी प्रमाणित केल्यावर नादुरुस्त विंधण विहिरींऐवजी नवीन विंधण विहिर घेण्यात यावी.

५) विधंण विहिर घेतल्यावर, ती घेतल्याचा दिनांक, खोली, तांशी क्षमता, हातपंप बसविण्याचा दिनांक, विंधण विहिरीचा गावातील क्रमांक विंधण विहिरीला दिलेला विशिष्ट क्रमांक (Unique No.) विंधण विहिर खाजगी कंत्राटदाराने घेतली असल्यास त्याचे नांव व पत्ता इत्यादि तपशील विंधण विहिरीजवळ निर्देशिण्यात यावा.

६) विंधण विहिरींवर बसविलेल्या हातपंपाकरिता बांधावयाच्या प्लॅटफॉर्मची कामे घेण्यात यावीत, ही कामे सुचविणे, मंजूर करणे, त्यासाठी निधी आणि त्यांची अंमजबजावणी याकरिता ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर प्रकारच्या कामासाठी जी कार्यपध्दती विहित केली आहे तीच कार्यपध्दती लागू राहील. विंधण विहिरीवर बसविलेल्या हातपंपाकरिता बांधण्यात यावयाच्या प्लॅटफॉर्मचे संकल्पचित्र सोबतच्या प्रपत्रात दिल्या आहेत.

१०. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ - क्रमांक ९३१/ व्यय ३, दिनांक ४.११.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,




३५१

मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
सर्व उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद
संचालक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक , भूजल सर्वेक्षणआणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
वित्त विभाग. मंत्रालय. मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.




३८०

## हातपंपासाठी ओटयाची रचना




एका ओट्याचे बांधकाम करण्यासाठी खालील साहित्य वापरावे लागते.


१. सिमेंट ६ पोती
२. वाळू ०.४० घनमीटर (१४ घमेली)
३. खडी ०.८० घनमीटर (२८ घमेली)
(२० एमएम साईझ)



लॅट्रीनचे बांधकाम

**ओटा पूर्ण करा**

एक ... बांधकाम ...
आवश्यक मालाचे अंदाजे वर्णन पुढीलप्रमाणे
१. सिमेंट ६ पोते
२. वाळू ०.४० घनमीटर (मि.)
३. खडी ०.८० घनमीटर (मि.)
(२० एमएम साईझ)





3<3

## ओट्याचे क्युरींग

- ओट्याचे क्युरींग करण्यासाठी नालीचे तोंड बंद करून ओट्यावर पाणी साचवून ठेवा.
- ग्रामस्थांना ओट्याच्या परिसरात न येण्यास आवाहन करा.
- कौंक्रीटचे मिश्रण घट्ट होण्यास सात दिवसांचा कालावधी द्या.
- ओट्याभोवती काटेरी झुडपे पसरवा व ओटा झाकून ठेवा जेणेकरून जनावरे अथवा माणसे ओट्यावर पाय देणार नाहीत.

